## सूचना (NOTIFICATION)

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१ उमेदवारांना येत असलेल्या अडचणींबाबत.

उपरोक्त नमूद परीक्षेकरीता online अर्ज करताना उमेदवारांना येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात आली असून त्याप्रमाणे -

१. अनुरेखक पदासाठी अर्ज करताना ज्या उमेदवारांनी Intermediate grade drawing examination उत्तीर्ण केली आहे. ते आता Intermediate grade drawing examination परिक्षेकरीता १० वी (SSC) पूर्वीचा दिनांक अर्जामधे नमूद करू शकतात. तसेच सदर रकान्यामध्ये मार्क्स नमूद करणे अनिवार्य नाही.

२. पदवीधारक उमेदवार ज्यांना पदवीच्या निकालामध्ये मार्क्स ऐवजी CGPA गुणांकन नमूद आहेत, अशा उमेदवारांना अर्ज भरताना अडचण येत होती. संबंधित रकान्यामध्ये (Marks Obtained and Total Marks) मार्क्स भरण्याची अनिवार्यता काढून टाकण्यात आली आहे.

३. अंशकालीन उमेदवारांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार ५५ वर्षापर्यंतच्या उमेदवारांना अर्ज करता येतील अशी तरतूद online अर्जामध्ये करण्यात आली आहे.

४. दिव्यांग, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन, माजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, माजी सैनिक प्रवर्गातील उमेदवारांना टंकलेखन प्रमाणपत्र अर्ज सादर करीत असताना प्राप्त असणे अनिवार्य नाही. तथापि, online अर्जामध्ये असलेल्या अनिवार्यतेमुळे या प्रवर्गातील उमेदवारांना अर्ज भरता येत नव्हता. अशा प्रवर्गातील उमेदवारांकरीता सदर अनिवार्यता काढून टाकण्यात आली आहे. परंतू या प्रवर्गाशिवाय अन्य प्रवर्गातील उमेदवारांकडे अर्ज सादर करताना टंकलेखनाचे प्रमाणपत्र प्राप्त असणे अनिवार्य आहे.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**